# B.A. Part–II (Semester—III) Examination

## (Literature of Modern Language)

## MARATHI LITERATURE

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :— बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहीत धरली जातील.

1. संदर्भासह स्पष्टीकरण द्या : 16

(अ) "मीही तुझ्यासारखाच एक. उक्त काम घेतलंय मी है नंबर घालण्याचं. पोटापाण्यासाठी काही तरी करायचं !"

**किंवा**

"तुमाले भूका कशा आये ?" "थोड़ी !" मी खोटं सांगतो. "सरु, तुले ?" "मलेई थोडी." दुसरं काय म्हणणार ? "पीठ पाय बरं मडक्यात किती आये त..."

(ब) "घेशील रे. अन् हे गोट्यांचे राज्य. दुसऱ्याला देतापण येते. देऊन टाक न कुणाला जरा–"

**किंवा**

"काय न्हाई.....! इचनाळच्या म्हातारीला बरं न्हाई तवा शालूला घीऊन ये असा सांगावा आलाय म्हणूनशान आलोय."

(क) मन करारे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण।
मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छा ते।।१।।
मनें प्रतिमा स्थापिली। मनें मना पूजा केली।
मने इच्छा पुरविली। मन माऊली सकळांची।।२।।

**किंवा**

मुंगीचिया घरा कोण जाय मूळ ?। देखोनिया गूळधावघाली।
याचकाविण काय खोळंबला दाता ?। तोचि धावे हिता आपुलिया।
उदक अन्न काय म्हणे मज खा ये ?। भुकेला तो जाये चोजवीत।
व्याधी पिडिला धावे वैद्याचिया घरा। दु:खाच्या परिहारा आपुलिया।

(ड) दधिमाझी लीणी जाणती सकल। ते काढी निराळे जाणे मथन।
अग्नि काष्ठामाजी ऐसे जाणे जन। मथिलियाविण कैसा जाळी।
तुका म्हणे मुख मळीण दर्पणीं। उजळिल्या वाचूनि कैसे भासे ?।

**किंवा**

आम्हा घरीं धन शब्दाची च रत्ने। शब्दांची च शस्त्रे यत्न करू।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दें वाटू धन जनलोकां।
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव। शब्दें चि गौरव पूजा करू।

2. ‘कथा’ वाङ्मय प्रकारातील ‘व्यक्तिचित्रण’ या घटकाचे महत्त्व स्पष्ट करून ‘रामा मैलकुली’ या कथेचे मूल्यमापन करा. 16

**किंवा**

जीवनातील विविध समस्या, सुखदु:ख आणि आशाआकांक्षांचे चित्रण ‘निवडक मराठी कथे’ तून कसे चित्रित झाले आहे, ते तुमच्या शब्दात लिहा.

3. (अ) शालेय जीवनातील निरागस भावबंध आणि आपोआप घडलेले संस्कार, वा.कृ. चोर घड्यांनी ‘संस्कार’ कथेतून कसे रेखाटले आहे, ते सांगा. 8

**किंवा**

‘देशी उपाय’ या कथेतील नवश-बायकोच्या आजारपणाची चर्चा करून अस्सल उपायाबाबत चर्चा करा.

(ब) ‘ट्रॉयचा घोडा’ या कथेतून अंतराळातले रोमांचक अनुभव जयंत नारकीकरांनी कसे रेखाटले आहे, ते सांगा. 8

**किंवा**

‘माणसाची गोष्ट’ ही रूपककथा उलगडून दाखवा.

4. (अ) शेतकऱ्यांनी नित्य सावध असावे, जागरूक रहावे, असा संदेश तुकारामाच्या अभंगातून आला, त्याचे स्पष्टीकरण द्या. 8

**किंवा**

‘वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे....’ या अभंगातून संत तुकारामांनी व्यक्त केलेली उदात्त भावना स्पष्ट करा.

(ब) माणसाची खरी कर्तबगारी, कीर्ती आणि श्रेष्ठत्व हे गुण ‘खडतर परीक्षा’ या शीर्षकातून तुकारामांच्या अभंगांद्वारे उलगडून दाखवा. 8

**किंवा**

‘उत्कट आनंदाची सर्वोच्च अवस्था’ तुकारामांच्या ‘आनंदाचेडोही आनंदतरंग’ या अभंगातून कशी रेखाटली आहे, ते तुमच्या शब्दांत सांगा.

5. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे लिहा :

(1) यू एस एफ च्या मुख्य कॉन्फरन्स रूम मध्ये कोणाची सभा भरली ? 1

(अ) नेत्यांची (ब) पाहुण्यांची

(क) प्रतिनिधीची (ड) कामगारांची

139 139 139 139 139

(2) घरासमोरील गल्लीत कशाची गर्दी होती ? 1

(अ) माणसांची (ब) पाहुण्यांची

(क) नातेवाईकांची (ड) बध्यांची

(3) 'देशी उपाय' या कथेचे लेखक कोण ? 1

(अ) उद्धव शेळके (ब) जयंत नारळीकर

(क) शंकर पाटील (ड) वामन होवाळ

139

(4) अंमलदाराला शोधण्यासाठी रामा कुठे गेला होता ? 1

(अ) गोठाणाकडे (ब) मोटारीकडे

(क) पंचायतीकडे (ड) शाळेकडे

139

(5) चहा-तंबाखुला महाग झाल्या खेरीज तो _______ हात लावायचा नाही. 1

(अ) पैशाला (ब) कामाला

(क) कुऱ्हाडीला (ड) पाकिटाला

(6) बयाजी तूर्तास _______ हजार रुपये रोख रकमेचा मालक होता. 1

(अ) अडीच (ब) एक

(क) तीन (ड) साडेतीन

139

(7) मोहरमच्या सणात माझ्या अंगाला रंग लावून मला _______ बनवून नाचायला लाविले. 1

(अ) हत्ती (ब) कोल्हा

(क) वाघ (ड) लांडगा

(8) शिंद्याच्या म्हातारीनं मदघरात जाऊन सूपभर _______ काढल्या. 1

(अ) ओंब्या (ब) शेंगा

(क) कण्या (ड) तूरी

(9) तुकारामाचा बाहेरील बडेजावापेक्षा आंतरिक _______ भर होता. 1

(अ) शुद्धतेवर (ब) कर्मावर

(क) आत्म्यावर (ड) भक्तीवर

(10) जीवनात ज्याला काही मिळवायचे असेल, त्याने स्वत: _______ केली पाहिजे. 1

(अ) पराकाष्ठा (ब) धडपड

(क) चाकरी (ड) स्तुती

139

139

(11) कोणत्या वयात मनामध्ये एकप्रकारचे उतावळेपण असते ? 1

(अ) म्हातारपणात (ब) तरुणपणात

(क) बालपणात (ड) उतारवयात

(12) संत तुकारामांच्या मते कशाचे अवलंबणे लाजीखाणे आहे ? 1

(अ) भिक्षापात्र (ब) झोळी

(क) कटोरी (ड) कमंडलू

(13) मी _______ आहे. परंतु, माझे हे हात ढाल आणि तलवार धरण्यात गुंतले आहे. 1

(अ) क्षत्रिय (ब) झुंझार

(क) शूर (ड) पराक्रमी

(14) संत तुकाराम वृक्षवल्लींना काय संबोधतात ? 1

(अ) नातलग (ब) सोयरे

(क) भाऊबंद (ड) शेजारी

(15) अमृताच्या बेलीला कशाची फले लागेल ? 1

(अ) अमृताची (ब) लोण्याची

(क) चांदीची (ड) विषाची

(16) आनंदाच्या डोहामध्ये कशाचे तरंग उठतात ? 1

(अ) दु:खाचे (ब) सुखाचे

(क) आनंदाचे (ड) मैत्रीचे

139 139 139 139 139